अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

सोमवार, दि.१५ जानेवारी २०२४ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ९७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८ www.surajyadigital.com



# याची देही; याची डोळा, पाहिला अक्षता सोहळा

**सत्यम् सत्यम्ऽऽ दिड्डम दिड्डमऽऽ** महाराष्ट्रासह आंध्र आणि कर्नाटकमधून श्रध्देने आलेल्या हजारो सिध्देश्वरभक्तांच्या साक्षीने रविवारी दुपारी १ वाजून ४६ मिनिटांनी संमती कट्ट्यावर नंदीध्वजांचा अक्षता सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. भक्ती, शक्ती आणि किर्ती यांचा सुरेख संगम असलेला सोहळा पाहून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. संमती वाचन केल्यावर 'सत्यम सत्यमऽऽ दिड्डम दिड्डमऽऽ' असे मानकरी शेटे यांनी म्हणताच भाविकांनी अक्षता टाकून 'श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज की जय' चा एकच जयघोष केला. आणि नयनरम्य अक्षता सोहळ्याचा विधी पार पडला.

# 'विठ्ठल'वर गंडांतर!

## •अभिजीत पाटील यांच्यासह २१ संचालक संकटात
## •४३० कोटी थकवले,शिखर बँकेने कारवाइचे अस्त्र उगारले

✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील आणि त्यांच्या २१ संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी तक्रार राज्य सहकारी बँकेने (शिखर बँक) पंढरपूर ग्रामीण पोलिसांत दिली आहे.त्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या साखर कारखानदारीत मोठी खळबळ उडाली आहे. राज्य सहकारी बँकेचे मुद्दल आणि त्यावरील व्याज असे एकूण ४३० कोटी रुपये थकवल्याप्रकरणी ही तक्रार बँकेकडून दिली गेल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार गटाचे नेते अभिजित पाटील हे तीन साखर कारखान्यांचा डोलारा सांभाळत आहेत.आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मंगळवेढा-पंढरपूर विधानसभा मतदार संघातून उभारण्याची त्यांनी तयारी देखील चालवली आहे.पंढरपुरात सामाजिक कार्यावरही त्यांनी जोर द्यायला सुरूवात केलीय. अशा स्थितीत शिखर बँकेने अचानक कारवाईचे अस्त्र बाहेर काढल्याने पाटील हे चांगलेच अडचणीत येण्याची शक्यता आहे.**

राज्य सहकारी बँकेचे प्राधिकृत अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक कैलास घनवट यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील आणि त्यांच्या संचालकांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला इथेनॉल आणि सहवीजनिर्मितीसाठी कर्ज मंजूर करून उचल दिलेली आहे. त्यापोटी बँकेकडे कारखान्याची स्थावर आणि जंगम मालमत्ता गहाण ठेवण्यात आली आहे. तसेच ऊस गाळपातून तयार होणारी साखर आणि इतर उत्पादनेही बँकेकडे ताबेगहाण आहेत, त्यामुळे कारखान्याच्या या मालमत्तेवर राज्य सहकारी बँकेचा पहिला अधिकार आहे, असा दावा घनवट यांनी पत्रात केला आहे.

वेळोवेळी सूचना करूनही विठ्ठल सहकारी साखर कारखाना प्रशासनाने बँकेची कर्जाची रक्कम आणि त्यावरील व्याज भरलेले नाही. त्यामुळे कारखान्याचे हे खाते 'एनपीए'मध्ये निघाले आहे. बँकेने कारखान्याला २३ सप्टेंबर २०१९ रोजी नोटीस दिली होती. मात्र, कारखान्याने कर्ज न भरल्याने ३१ डिसेंबर २०२३ अखेर २५२.४९ कोटी मुद्दल आणि त्यावरील व्याज १७७.६८ कोटी रुपये इतकी थकबाकी आहे.

कारखान्याने उत्पादित केलेल्या साखरेवरही प्रथम हक्क बँकेचा होता. साखर विक्री करण्यापूर्वी कारखान्याने






प्रतिक्विंटल ८०० रुपये कर्जखात्यात बंधनकारक होते. कारखान्याने २०२२-२३ या हंगामात ६,६४,४२० क्विंटल साखर उत्पादन केली आहे. प्रतिक्विंटल ८०० रुपयांप्रमाणे ५३.५१ कोटी रुपये बँकेत भरणे आवश्यक होते. तसेच कारखान्याने उत्पादित केलेली वीज आणि इथेनॉलही बँकेच्या परवानगीशिवाय परस्पर विक्री केले आहे. मात्र, बँकेच्या खात्यात कोणत्याही रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील आणि त्यांच्या संचालकांना बँकेशी झालेल्या कराराची संपूर्ण माहिती आहे. कारखान्याच्या वतीने घेण्यात येणाऱ्या निर्णयास सर्व संचालक जबाबदार असतात. त्यामुळे कारखान्याची उत्पादने राज्य सहकारी बँकेच्या परवानगीशिवाय विक्री करून फसवणूक केली आहे. त्यामुळे कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील अणि संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी राज्य सहकारी बँकेचे सहायक व्यवस्थापक कैलास घनवट यांनी केली आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पाटील आणि संचालकांवर कलम ४०२,४२०, ४२१, ४२२, ४२३, ४२४ आणि कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही घनवट यांनी पंढरपूर पोलिसांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## कारखान्याचे निवेदन

यासंदर्भात कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक डी.आर.गायकवाड यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या विषयातील तथ्य जाणून न घेता श्री विठ्ठल कारखान्याच्या चांगल्या कारभाराच्या विरोधातील घटकांकडून जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण केला जात आहे.ज्या कर्जाबाबत बातमी प्रसिद्ध होत आहे, ते कर्ज मुळात कारखाना बंद पाडणाऱ्या पूर्वीच्या संचालक मंडळाने घेतले होते. तत्कालीन संचालक मंडळाने नियमित कर्जाची परतफेड न केल्याने सर्व कर्जखाती ही सन २०२१ पूर्वीच बँकेने एन.पी.ए. म्हणून घोषित केलेली होती व जप्तीची कार्यवाही देखील सुरू झाली होती. मागील संचालक मंडळामुळे सभासद आणि कारखाना अडचणीत कसा?

महाराष्ट्र राज्य बँकेने कारखान्याला दिलेल्या पहिल्या कर्जाचा विनियोग न पाहता बँकेने वेळोवेळी तत्कालीन संचालक मंडळाला कर्ज रूपाने मदत केली. यामध्ये केवळ तत्कालीन संचालक मंडळ यांच्या गलथान कारभारामुळे संस्थेवर कर्जबाजारी होण्याची वेळ आलेली आहे. एकंदरीत ६०० कोटींच्या आसपास त्यांनी कर्ज करून ठेवले होते. त्यांनी साखर विकली पण सभासदांची बिले दिली नाहीत. जवळपास ३० महिने कर्मचाऱ्यांचा पगार थकवला होता. २०१६ पासून तोडणी वाहतूक यांचेही असंख्य बिल थकवले होते. तसेच ३० कोटी उसाचे बिल बुडवून जुने संचालक मंडळ पळ काढण्याच्या परिस्थितीत होते. सन २०२२-२३ चा हंगाम सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य बँकेच्या ताब्यातील जुनी १,०९,९७३ क्विंटल साखर विक्री करून येणाऱ्या रक्कमेतून १/३ रक्कम अंदाजित रू.११.३६ कोटी बँकेला व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना २/३ म्हणजे रू.२२.७३ कोटी द्यावयाचे होते. शासनाच्या निर्देशानुसार साखर विक्रीतून सभासदांना देण्याची रू.२२.७३ कोटी ही मोठी रक्कम संचालक मंडळाने बाहेरून उभी करावी पण बँकेला साखर विक्रीची पूर्ण रक्कम भरावी असे सांगण्यात आले. त्याप्रमाणे साखरेच्या लिलावामधून आलेली सर्व रक्कम रू.३०.७७ कोटी बँकेच्या कर्जासाठी कारखान्याने भरणा केलेला आहे. स्वतःच्या मालमत्ता गहाण ठेऊन कर्ज काढून शेतकऱ्यांची (मागच्या संचालक मंडळाने बुडवलेली) थकीत रक्कम स्वतः भरली!!! कारखाना सुरू करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या हितासाठी बँकेचा प्रस्ताव मान्य करून स्वतःच्या मालमत्ता गहाण ठेवून निधी उभा करून थकीत ऊस बिले साधारण रू. ३०.०९ कोटी रूपयांची (एफ.आर.पी.) विद्यमान संचालक मंडळाने शेतकऱ्यांना अदा केलेली आहेत. तेही शब्द दिल्याप्रमाणे मोळी टाकायच्या आधी.

# पालकमंत्री कोणाला भेटत नाहीत प्रश्न कसे सुटणार?

## आमदार रोहित पवारांची पाटील यांच्यावर टीका

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा नुकसानभरपाई मिळाली ना गेल्या वर्षाच्या अतिवृष्टीचा निधी, कांदा अनुदानाचेही भिजत घोंगडे कायम आहे. दुधाचे भाव पडले आहेत. यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर रुप धारण करीत आहे. याकडे सरकारचा प्रतिनिधी म्हणून पालकमंत्र्यांचे लक्ष असायला हवे. परंतु पालकमंत्री महिन्यातून एकदा येतात आणि आले तरी सुरक्षेच्या कारणावरून त्यांना भेटू दिले जात नाही. ते स्वत:ही कुणाला भेटत नाहीत. मग लोकांचे प्रश्न कसे कळणार?, असा सवाल राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला

रविवारी, ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रेतील अक्षता सोहळ्यासाठी आमदार रोहित पवार सोलापुरात आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. तत्पूर्वी त्यांनी पार्क स्टेडियम मैदानाची पाहणी करून क्रिकेटचा खेळ खेळला.



सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढत आमदार पवार यांनी आरोग्य विभागातील सावळा गोंधळ चव्हाट्यावर आणला. अर्थमंत्र्यांशी कसलीही चर्चा न करता किंवा त्यांना माहिती न देताच आरोग्यमंत्र्यांनी औषध खरेदीचे निविदा प्रक्रिया राबवून ६० कोटींची खरेदी ६०० कोटींवर नेली. केवळ भ्रष्टाचार करण्यासाठीच हा खटाटोप करण्यात आला असून आज अनेक सरकारी दवाखान्यात औषधे मिळत नाहीत. सध्या थंडीचे दिवस सुरू आहेत. लोकांना खोकल्याची औषधे मिळत नाहीत. लोह आणि कॅल्शियमच्या गोळ्यांचा साठाही संपला आहे. बालके आणि महिलांसाठी आवश्यक असलेल्या औषधांचाही साठा संपलेला आहे. स्वत:च्या नावासाठी आरोग्यमंत्री राबवित असलेल्या आरोग्य शिबिरात सरकारी डॉक्टर आणि सरकारी औषधांचा वापर केला जात आहे. त्यामुळेच औषधांचा तुटवडा जाणवत आहे असा आरोप करून आरोग्यमंत्री हे राज्याचे की मतदारसंघाचे असा सवालही आमदार पवार यांनी केला.

विविध सरकारी विभागातील नोकरभरतीतही घोटाळा केला जात आहे. मराठा आणि धनगर आरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला असतानाही सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. मराठा, धनगर, लिंगायत समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल तर घटनात्मक दुरूस्ती करावी लागणार आहे. परंतु हे सरकार पक्ष आणि कुटूंब फोडण्यातच दंग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर आरक्षणाचा प्रश्न काढण्याची ताकद या सरकारमध्ये नाही

अयोध्या येथील श्री राम मंदिर उद्घाटन सोहळ्यात धार्मिक कार्यक्रम कमी आणि राजकीय कार्यक्रम जास्त होत. आहेत, असा धर्मगुरूंचा आरोप आहे. मंदिर पूर्ण होण्याआधीच तो कार्यक्रम घेतला जात आहे. त्यामुळे लोकांना राजकीय वास येत आहे. तसेच विकासाचे मुद्दे भाजपकडे राहिले नाहीत. त्यामुळे राम मंदिरावर निवडणुका लढायच्या आहेत, अशी टीकाही आमदार पवार यांनी केली.

### चिमणी पाडकामाचा उद्देश सफल झाला का?

शेतकरी व कामगारांची जीवनवाहिनी असलेल्या श्री सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी ज्या विमानतळासाठी पाडण्यात आली, तो भाजपचा उद्देश सफल झाला का?, झाला नसेल तर मग आता पंतप्रधान नरेंद्र मोदी सोलापूर दौर्यावर येत आहेत. त्यांना कोणत्या विमानतळावर उतरविणार असा टोला आमदार रोहित पवार यांनी लगावला. शेतकऱ्यांना डावलून केवळ राजकीय द्वेषातून चिमणी पाडली. विमानसेवेच्या नावाखाली चिमणी पाडली परंतु अजुनही विमानसेवा सुरू झाली नाही. त्यामुळे शेतकरी, कामगारांची मते आता महायुतीच्या विरोधात गेली आहेत, असेही आमदार पवार यांनी सांगितले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**या पक्षांतरमुळे 'इकडे गूळ, तिकडे तीळ' झालंय!**

# मोहोळ तालुक्यातील आष्टीजवळ गोळीबाराचा थरार; दोघेजण बचावले

✔ सुराज्य/मोहोळ

पंढरपूर-कुर्डूवाडी रस्त्यावरील मोहोळ तालुक्यातील आष्टी गावाजवळ शनिवारी रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास गोळीबार झाल्याने परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. दैव बलवत्तर म्हणून ज्यांच्यावर गोळीबार झाला,त्यातील दोघेही या हल्ल्यातून बचावले.

हा हल्ला कौटुंबिक वादातून झाला असल्याचा पोलिसांचा संशय असून घटनास्थळावरून दोन जिवंत काडतुसे पोलिसांना मिळाली आहेत तसेच याप्रकरणी पटवर्धन कुरोलीतून काही जणांना ताब्यात घेतले.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की- रात्री नऊ ते साडेनऊ च्या दरम्यान सिध्देश्वर नाईकनवरे आणि त्याचा मेव्हणा आदित्य व्यवहारे हे दुचाकीवरून पंढरपूरहून आष्टीकडे येत असताना मागून आलेल्या अज्ञात दुचाकीवरील हल्लेखोरांनी त्यांना काठीने मारून गाडीवरून पाडले. यानंतर या अज्ञाताने आपल्याकडील गावठी कट्ट्यातून त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या. प्रसंगावधान ओळखून या दोघांनी गोळ्या चुकवत शेजारच्या उसात धाव घेतली. दरम्यान, या मार्गावरून दुसऱ्या मोटारसायकली आल्या आणि अपघात झाल्याचे समजून थांबताना दिसताच हल्लेखोरांनी पळ काढला. यामुळे या जीवघेण्या हल्ल्यातून सिध्देश्वर नाईकनवरे आणि आदित्य व्यवहारे यांचे प्राण वाचले. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरु केला असून प्रथमदर्शनी हा हल्ला कौटुंबिक वादातून झाला असल्याचा अंदाज मोहोळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांनी सांगितले.